# बीड जिल्ह्यात हजारो बालके बाल संगोपन अनुदानापासून वंचित; लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक थाबवा?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २२१ ■ मंगळवार दि.२९ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 221 ■ Tuesday Dt.29 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब, तुम्ही अनाथांचे नाथ व्हा?

## महिला व बालकल्याण मंत्री आदितीताई तुम्हीच लक्ष घालून या गोरगरीब मुलांना न्याय द्या?

## ■ बीड जिल्ह्यात संस्थेच्या नियुक्तीनंतर लेकरांचा खेळ मांडला; शासनाचे काम आणि सहा महिने थांब?

## ■ आई-वडिलांचे छत्र नसलेल्या गोरगरीब मुलांच्या ताटात माती कालवणाऱ्यांवर कारवाई करा?

बीड । प्रतिनिधी

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन संगोपन योजनेतील लाभासाठी आतापर्यंत हजारो मुला, मुलींच्या पालकांनी महिला व बालकल्याण विभागाकडे अर्ज केला आहे. यातील पात्र ठरलेल्या बालकांचे पालकही नियमित अनुदानापासून वंचित आहेत.अनेक अर्ज मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. याचे पालक तालुका ते जिल्हा कार्यालयातील आता संस्था चालकाकडे गेल्याने संबंधीत संस्था कार्यालयात वारंवार हेलपाटे मारत आहेत. शासनाचे काम आणि सहा महिने थांब असा अनुभव येत आहे. विधानसभेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून लाडक्या बहिणीला दर महिने १५०० रूपये जमा करणारे शासन मात्र परिस्थितीमुळे अनाथपण आलेल्या बालकांना मात्र दर महिने २२५० रूपये निर्वाह भत्ता देण्यासाठी टाळटाळ करीत असल्याचा आरोप होत आहे.

आई–वडिलांचे छत्र हरवलेल्या बीड जिल्ह्यातील हजारो बालकांसाठी दरमहा आर्थिक मदत देणाऱ्या बाल संगोपन योजनेचा लाभ भरपूर बालके घेतात पण् बीड जिल्हा महिला बालकल्याण संगोपन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणा व संस्था





चालकांचा मनमानी कारभार करत असल्यामुळे अनेक बालके या योजनेपासून वंचित राहत आहेत. सविस्तर वृत्त असे की बालकाचे आई किंवा वडील किंवा दोघेही मृत पावले असतील अशा बालकांसाठी राज्य शासनाने सावित्रीबाई फुले बाल संगोपन या या नावाने एक शैक्षणिक योजना सुरू केली. या योजनेमार्फत सदरील बालकास शिक्षण व उदरनिर्वाहासाठी २२ ५० महिना सुरू केला व दहा महिन्याचे २२५०० भेटतात परंतु मागील वर्षापासून बालसंगोपन विभागाने हे काम स्वतः न करता बीड जिल्ह्यात संस्थाची नियुक्ती केली आहे परंतु या संस्था ज्या बालकाचे पालक पैसे देतील त्यांच्याच फाईल पुढे सरकवतात व यावर्षी पूर्ण पैसे न येता कुणाला २२५० ते कुणाला ११२५० रुपयांपर्यंत पैसे भेटले उर्वरित पैशाचे काय? या संस्थांच्या चुकीमुळे कित्येक बालक या योजनेपासून वंचित आहे शेकडोफाइल पडून आहेत मागील वर्षाचे अनुदान अजूनही भेटले नाहीत फक्त आणि फक्त संस्थांच्या चुकीमुळे ते विद्यार्थी या योजनेपासून वंचित आहेत या अगोदर मार्चला संपूर्ण दहा महिन्याचे बावीस हजार पाचशे रुपये भेटायचे परंतु यात संस्थाचा हस्तक्षेप वाढल्याने व पैशाचा दिवाण–घेवाण वाढल्याने खरे बालक या मदतीपासून वंचित आहे सदरील संस्थाचालक फाईल दाखल करणे अगोदरही पैसे घेतात आणि खात्यावर थोडेफार पैसे आले तरी पैशाची मागणी करतात यापूर्वी जेव्हा बाल संगोपन विभागाकडे काम होते त्यावेळेस कुठलेही संस्थेचा हस्तक्षेप नव्हता व बालसंगोपन विभागाचे कर्मचारी येऊन शहानिशा करत असत सदरील बालकाचे आई वडील मृत्यू पावले आहेत का नाही व आर्थिक व घराची पाहणी करत असत परंतु हेच संस्था वाले पैसे दिले तर कार्यालयात बसून ठराव देतात व पैसे दिल्यानंतरच फाईल पुढे सरकवतात. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेबांनी या संदर्भात घालून सदरील व बाल संगोपन विभागास मागील वर्षाची पूर्ण पैसे सदरील बालकांच्या खात्यावर जमा करण्यासाठी लक्ष

▶ पान २ वर



## जबरीने मोबाईल हिसकावुन घेवुन जबरी चोरी करणाऱ्या दोन इसमांना केले जेरबंद

बीड । प्रतिनिधी

फिर्यादी अभिषेक दिनकर केदार वय २० व्य.शिक्षण रा.संतज्ञानेश्वर नगर यांनी पो.स्टे.शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, दि.११/०४/२०२५ रोजी रात्री ०९.१५ वा. सुमारास पिंपरगव्हाण रोड, गायत्री दुकानाच्या जवळ रोडवरुन घरी फोनवर मित्राला बोलत चालत जात असतांना पाठीमागुन काळया रंगाच्या स्प्लेंडर मोटार सायकलवर तिघेजण आले व त्यातील एका अज्ञात इसमाने माझा मोबाईल हिसकावुन घेवुन ते तिघे तेथुन निघुन गेले. वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे गु.र.नं.२१०/२०२५ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हयाची दि.१२/०४/२०२५ रोजी नोंद करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा उकल करण्याचे दृष्टीकोणातुन मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिले. त्यावरुन पो.नि. स्था.गु.शा.बीड यांनी आपले अधिपत्याखालील पोउपनि सुशांत सुतळे व त्यांचे पथकाला गुन्हयाचे उघडकीस आणण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. पोउपनि सुशांत सुतळे यांनी त्यांची गोपनिय यंत्रणा सतर्क करुन दिनांक २८/०४/२०२५ रोजी स्थागुशा पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, दोन इसम हे बीड शहरातुन वेगवेगळया ठिकाणाहुन मोबाईल हिसकावुन चोरुन नेलेले मोबाईल विकणेकामी समर्थ मंगल कार्यालय समोर ते अहिल्यानगर जाणाऱ्या रोडवर येणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली तेव्हा सदर माहिती पो.नि. स्था.गु.शा. यांना देवुन

▶ पान २ वर

बंगाली पिंपळा येथील घटना; कारवाईची कुटुंबीयाची मागणी

## शेतरस्ता उभ्या पिकातून नेल्याने शेतकऱ्यांची गळफास लावून आत्महत्या

गेवराई । प्रतिनिधी

शेतरस्ता एका बाजूने नेण्याची विनंती करुनही संबधितानी उभ्या पिकातून मध्यंतरातून रस्ता नेल्याने एका वयोवृद्ध शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सुधाकर त्र्यंबक देशपांडे (वय ७९) रा.बंगाली पिंपळा ता. गेवराई जि.बीड असे आत्महत्या केलेल्या वयोवृद्ध शेतकऱ्याचे नाव आहे. बंगाली पिंपळयात सध्या रोजगार हमी योजनेंतर्गत शेतवरस्त्याचे काम सुरू होते.



हेच काम सुधाकर देशपांडे यांनी शेताच्या मध्यंतरातून न नेता एका बाजूने नेण्याची विनंती केली. एवढेच नाही तर हा शेतरस्ता या ठिकाणाहून नसताना त्यांनी रस्त्याला विरोध केला नाही. फक्त मध्यंतरातून रस्ता न नेता शेताच्या बांधावरून नेण्याची विनंती केली. मात्र, त्यांच्या

▶ पान २ वर

## पायाखालची माती ढासळल्याने बांधकाम मजुराचा विहिरीत पडून मृत्यू

### गेवराई तालुक्यातील रोकडा शिवारातील दुर्दैवी घटना!

गेवराई । प्रतिनिधी

विहिरिच्या सिमेंट कड्याचे बांधकाम करताना अचानक पायाखाली माती ढासळल्याने बीडमधील गेवराईतील बांधकाम मजुराचा मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी घडली. मोहन विष्णू शिंनगारे (वय २७) रा.तलवाडा ता.गेवराई जि.बीड असे मृत झालेल्या बांधकाम मजुराचे नाव आहे.

रोकडा(ता गेवराई)शिवारातील राजेंद्र चव्हाण यांच्या विहिरीचे कडे बांधकामाचे काम घेतल्याने आज सकाळी दहा वाजेच्या सुमारास मोहन शिंनगारे हे काम करत असताना अचानक त्यांच्या पायाखालची माती ढासळल्याने ते विहिरीत पडले. डोक्याला जास्तीचा मार लागल्याने मोहन यांचा जागीच मृत्यू झाल्याची माहीती मिळाली आहे.

या घटनेची तलवाडा पोलीसांना माहीती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, पोलिस जमादार नारायण काकडे, भीमसेन जाधव, विठ्ठल राठोड



घटनास्थळावर दाखल होऊन मृतदेहाचा पंचनामा करून तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन केल्यानंतर सायंकाळी मोहन शिंनगारे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत मोहन यांच्या पाश्चात्य आई–वडिल, पत्नी,दोन मुले असा परिवार असून घरातील कर्ता गेल्याने शिंनगारे कुटुंबीय उघड्यावर पडल्याने तलवाड्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## साक्षाळपिंपरी येथील शेतकऱ्याच्या विहिरीतील पाणी चोरीला

### आंब्याची झाडं अन् गुरं कशी जगवायची? शेतकरी व्याकूळ! संबंधित पाणी चोरणाऱ्यांवर कारवाई करण्याची शेतकऱ्याची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

साक्षाळपिंपरी येथील शेतकऱ्यांच्या विहिरीतील पाणी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. सहा टँकर पाणी कुणीतरी पळवल्याने भर उन्हात गुरांना पाणी कोठून आणायचं? असा प्रश्न शेतकऱ्याने उपस्थित केला आहे. याशिवाय शेतीत लावलेली आंब्याची झाडं पाण्यावाचून करपण्याची शक्यता आहे. आजवर आपण सोनं–चांदी, पैसे चोरीला गेल्याचे ऐकलं असेल. पण साक्षाळ पिंपरी गावात त्रिंबक काशीद नामक शेतकऱ्याच्या विहिरीमधील चक्क सहा टँकर पाणी चोरीला गेलं आहे. जिल्ह्यामध्ये भयंकर दुष्काळ आणि पिण्याच्या पाण्याची भासत असलेली टंचाई या अनुषंगाने त्रिंबक काशीद या शेतकऱ्याने गेल्या दोन महिन्यांपूर्वी आपल्या शेतातील असलेल्या विहिरीमध्ये अडीच परस पाणी साठवून ठेवलं होतं.

हे पाणी त्यांच्या गुरा–ढोरांसाठी त्याचबरोबर त्यांनी वीस गुंठ्यामध्ये आंब्याचे झाड लावले आहेत, ते जगवण्यासाठी साठवून ठेवलं होतं. मात्र पाणी चोरण्याचा उद्योग काही चोरट्यांनी केला आहे. तसेच काही


▶ पान २ वर





# चाकरवाडी येथे प्रदीप मिश्राजी यांच्या भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन





## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते मंडप उभारणीचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ (रौप्य महोत्सवी वर्ष) निमित्त परमपूज्य पं. श्री. प्रदीप मिश्राजी यांच्या भव्य शिवमहापुराण कथेच्या आयोजनासह भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी भव्य अशा प्रकारचा मंडप उभारला जाणार असून बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते दिनांक ३० एप्रिल रोजी अक्षय



तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर मंडप उभारण्याचे पूजन करून मंडप उभारणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन त्यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले.

यावेळी व्यापारी महासंघाचे बीड जिल्हाअध्यक्ष संतोष सोहनी, विनोद पिंगळे, दै.झुंजार नेता चे उपसंपादक अशोक वाणी, अभिषेक चरखा, पंकज भुतडा, राजू पटेल, शत्रुघ्न पटेल, मनोज देशमुख यांचे उपस्थिती होती. कार्यक्रमाचे भव्य दिव्य नियोजन पाहता उपस्थित भक्तांची संख्या १२ ते १५ लाखाच्या जवळपास राहणार आहे.



# जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशाला दिली : ॲड.सर्जेराव तांदळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २८.०४.२०२५ वार सोमवार रोजी बीड तालुक्यातील रुई लिंबा या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस ॲड.सर्जेराव तात्या तांदळे, संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे सर, उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, शांतिनाथ डोरले आदि प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

आपल्या मनोगतात ॲड.तांदळे म्हणाले की, आज जो आपल्या देशाचा कारभार, कायदा, कानून चालत आहे तो फक्त डॉ.बाबासाहेब यांनी तयार केलेली राज्यघटना आणि पवित्र संविधान ह्या मुळे. आज समजातील सगळ्यात मागासलेला, गरीब, पिछाडलेला समाज याला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम डॉ. बाबासाहेब यांनीच केले. आज त्यांच्यामुळे प्रत्येक समाजातील वर्गाला समान न्याय मिळाला. प्रत्येकाला शिक्षणाची नोकरीची संधी मिळाली. मागासलेल्या समाजामध्ये आज अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन, संविधानाने मिळवून दिलेल्या हक्कामुळे आयपीएस,आयएएस अशी उच्चपदे भूषवली आहे.पुढे बोलताना ॲड.तांदळे म्हणाले की, आपल्या जयदत्त नगर व बाकीच्या गावपरिसरातील जे काही विकासाचे प्रश्न प्रलंबित आहेत ते आपण ना.पंकजाताई च्या माध्यमातून शंभर टक्के पूर्ण करू. गल्ली ते दिल्ली आज आपले सरकार आहे त्यामुळे चांगल्या आणि सकारात्मक कामाला आपल्याला कसल्याही प्रकारची अडचण येणार नाही. या कार्यक्रमास लहू लगड सर, गणेश म्हेत्रे सर, दलीत पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, सचिन तिपटे, गणेश प्रभू पवार, महादेव उद्धव ओव्हाळ,राहुल कचरू कांबळे, प्रभू नामदेव पवार, सतीश दशरथ सोळुंके, सागर सुरेश सोळुंके, अशोक गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन विकास वाव्हळ यांनी केले होते.



# विज वितरणच्या लक्की डिजिटल योजने अंतर्गत गेवराईच्या पाच ग्राहकांना स्मार्ट फोन वितरीत

गेवराई । प्रतिनिधी

विज वितरण कंपनी कडून नियमीत विज भरणा करर्णाय़ा पाच लक्की ग्राहकांना स्मार्टफोन देण्यात आले आहेत तसेच विज वितरण च्या मुख्य कार्यलय मुबंई याठिकाणी लक्की ड्रॉ करण्यात आला होता तसेच यामध्ये गेवराई तालुक्यातील पाच नियमीत विज बील भरणा करणाऱ्या ग्राहकांना स्मार्टफोन बक्षीस देण्यात आला असून यांचे वितरण गेवराईचे कार्यकारी उप अभियंता एस.एम. मोरे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, महावितरण कंपनी महाराष्ट्र राज्य यांनी गेल्या तिन महिण्यापुर्वी नियमीत बील भरणा करर्णाय़ा ग्राहकांना डिजिटल लक्की या योजने अंतर्गत स्मार्टफोन तसेच स्मार्टवॉच अशी बक्षीसे ठेवण्यात आली होती तसेच गेल्या सहा महिण्यापासून विज बिल न थकवता अश्या ग्राहकांना या योजनेत समाविष्ठ करण्यात आले होते तसेच याचा लक्की ड्रॉ विजवितरण मुंबईच्या कार्यलयात झाला तसेच गेवराई तालुक्यातील विष्णू काशिनाथ गूंजाळ रा. धोंडराई, प्रज्ञेश प्रभाकरराव पराठ रा. गेवराई, अमोल बाबूराव वाकडे रा. धोंडराई, अनिलकूमार अमृतसिंग कुशवा रा. गेवराई, एस के बशीर गफूर रा. उमापूर या पाच लक्की ग्राहकांना स्मार्टफोनचे वितरण गेवराई महावितरण कार्यलयात करण्यात आले.

यावेळी कार्यकारी उप अभियंता एस.एम. मोरे, संपादक अविनाश इंगावले, सा ले ए आर वाघमोडे, जक्कल, हितनाळीकर, प्रधान, काशिद यांची उपस्थिती होती.

# सोने सावरगाव ग्रामस्थांची भगवानगडाला १ कोटी ३ लाख रुपये देणगी जाहीर

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

भगवानगड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.



श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे सोने सावरगाव (ता.पाटोदा जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी ३ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# लक्ष्मण आठवले यांचे वृद्धापकाळाने निधन

बीड । प्रतिनिधी



कुक्कडगाव येथील आदर्श नागरिक लक्ष्मण काशिनाथ आठवले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी मंगळवार मध्यरात्री २.२५ वा वृद्धपकाळाने निधन झाले त्यांचा अंत्यविधी सकाळी १०:३० वा कुक्कडगाव या ठिकाणी नातलग, अपतेष्ठ, ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्वांशी प्रेमाने आणि आपुलकीने बोलण्याने त्यांनी अनेकांशी ऋणानुबंध जोडले होते. त्यांचे रक्षाविसर्जन गुरुवार दि.१ मे रोजी सकाळी ८ वा.आणि जलदान विधी दु.१२:३० वा. त्यांच्या राहत्या घरी संपन्न होईल. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवंडे, नातलग असा मोठा परिवार आहे.

# बुधवारी इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे माधव महाराज डाके यांचे हरीकिर्तन

बीड । प्रतिनिधी



श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ महाराज प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे गेल्या १३ वर्षापासुन दरवर्षी अखंड त्रिदिवशीय हरीनाम सोहळ्याचे आयोजन करण्यात येते याही वर्षी मुर्ति प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त ३० एप्रील ते २ मे २०२५ या कालावधीत अखंड त्रिदिवशीय हरीनाम सोहळ्याचे आयोजन केले आहे. या सोहळ्यात दि.३० एप्रिल बुधवार रोजी रात्री ८:३० वा. प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. माधव महाराज डाके (काठवडेकर) यांचे सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी याकिर्तनाचा लाभ शहारातील परीसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप यांनी व त्यांच्या सर्व सहकारी भाविक भक्त यांनी केले.

# नाशिकमध्ये दिवसाढवळ्या रक्तरंजीत थरार

## धक्कादायक... चार जणांनी डोक्यात दगड घालून विधीसंघर्षित मुलाला संपवलं

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहरात एक संतापजनक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. शहराच्या कामटवाडे परिसरात दिवसाढवळ्या एका विधीसंघर्षित बालकाची डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे नाशिक शहरात एकच खळबळ उडाली आहे. दोन गटांमध्ये झालेल्या वादातून हत्या शक्यता व्यक्त केली जात आहे. मृत तरुणाचे नाव किरण चौरे असे असून, तो सराईत गुन्हेगार असल्याची माहिती मिळत आहे. हल्ला करणाऱ्या चार तरुणांनी मिळून किरण चौरे याच्यावर दगडाने वार केले. यामुळे त्याचा मृत्यू झाला. हल्ल्यानंतर मारेकरी घटनास्थळावरून फरार झाले आहेत.

या प्रकारानंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. घटनेची माहिती मिळताच अंबड पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व अंगांनी तपास करत आहेत आणि मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत. ही घटना दिवसाढवळ्या घडल्याने पोलिसांच्या गस्त आणि सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, नाशिक शहरातील विविध बसस्थानकांवर गर्दीचा फायदा घेत प्रवाशांचे दागिने आणि रोख रक्कम चोरत असलेल्या पंचवटीतील 'बंटी–बबली' दाम्पत्याला गजाआड करण्यात आले आहे. गुन्हे शाखेच्या युनिट एकने ही कारवाई करत त्यांच्या विरोधातील पाच गुन्ह्यांचा पर्दाफाश केला आहे. सदर आरोपींनी चोरी केलेले सोन्याचे दागिने विकून एक कार खरेदी केल्याचे उघडकीस आले असून, पोलिसांनी साडे नऊ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे मंगेश अशोक राखपसरे आणि निशा मंगेश राखपसरे (दोघे रा. अवधूतवाडी, पंचवटी) अशी आहेत. गेल्या काही दिवसांत शहरातील महामार्ग, ठक्कर बाजार, द्वारका आणि नाशिकरोड येथील बसस्थानकांवर प्रवाशांकडून सोन्याचे दागिने व रोकड चोरीला गेल्याच्या अनेक घटना घडल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखेच्या युनिट एकचे हवालदार प्रशांत मरकड यांना माहिती मिळाली की, संशयित दाम्पत्य देवळाली कॅम्पजवळील संसरी गावात येणार आहे. वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक हिरामण भोये, उपनिरीक्षक रवींद्र बागूल आणि त्यांच्या पथकाने सापळा रचून दोघांना अटक केली.

पान १ वरून...

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब...

घालावे अशी मागणी होत आहे व या संस्थांकडून कारभार काढून पूर्वीप्रमाणे बालसंगोपन विभागाकडे ठेवण्यात यावा म्हणजे सदरील संस्थांची या कामातील हस्तक्षेप राहणार नाही जेणेकरून खऱ्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ होईल अन्यथा खरे लाभार्थी वंचितांच्या दारी राहतील व बोगस लाभार्थ्यांचा संस्थामार्फत फायदा होईल या संस्था कडील हा अनाथ बालकांचा सर्व व्यवहार काढून घेऊन तो पुर्वी प्रमाणे बालसंगोपन विभागाकडे ठेवण्यात यावा अशी जनतेतून मागणी करण्यात येत आहे.

### जबरीने मोबाईल हिसकावुन घेवुन जबरी...

त्यांनी तत्काळ पुढील कारवाई करणेचे आदेश दिल्याने स्थागुशा पथक बातमी ठिकाणी जावुन तेथे सापळा लावला असता एक मोटार सायकलवर दोन इसम आल्याचे दिसुन आले तेव्हा त्यांचेकडे जात असतांना त्यांनी तेथुन मो.सा.वर पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यांना पथकाने पकडुन त्यांची नावे विचारली असता १) आदित्य बंकट नरवडे वय १९ वर्षे रा.बालेपीर ता.जि.बीड, २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे वय १९ वर्षे रा.ईट ता.जि.बीड असे सांगितले. मोबाईल हिसकावुन चोरी केलेल्या घटनांबाबत बारकाईने विचारपुस केली असता आदित्य नवडे व त्यांचे इतर दोन साथीदार यांनी मिळुन मो.सा.वर जावुन मो.सा.वर जावुन मोबाईल बोलत चालत असलेल्या लोकांचे मोबाईल हिसकावुन चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण १० रिअल मी, सॅमसंग अल्ट्रा, रिअल मी, विवो, ओपो, पो.को. कंपनीचे मोबाईल व गुन्हयात वापरलेली स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण २,८७,०००/– रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपींकडुन खालील नमुद उकल करण्यात स्था.गु.शा.पथकाला यश आले आहे.

पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं २१०/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं., पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं १६५/२०२५ कलम ३०४(४) भा.न्या.सं., पो.स्टे.बीड शहर गुरनं ४०/२०२५ कलम ३०३(२), भा.न्या.सं., पो.स्टे.बीड शहर गुरनं ६७/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी निष्पन्न करण्यात आलेले असुन १) आदित्य बंकट नरवडे रा.बालेपीर व २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे यांना पो.स्टे.शिवाजीनगर,बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. त्यांचेकडुन मोबाईल चोरीचे आणखीन इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्तता आहे. उर्वरित एक आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे.

सदरची कामगिरी श्री. नवनित काँवत पोलीस अधीक्षक बीड, श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे पोह/मारुती कांबळे, पोह/विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, देविदास जमदाडे, पोशि/ नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, चापोह/नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे.

### साक्षाळपिंपरी येथील शेतकऱ्याच्या....

पाणी शेतामध्ये वाया घालवले आहे. शेतकरी त्रिंबक काशीद व पत्नी रंभा काशीद हे दोन दिवस आपल्या नातेवाईकांकडे लग्नाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. याचाच फायदा घेऊन हे कृत्य केल्याचं त्यांनी सांगितलं आहे. घटना घडल्यानंतर महिला शेतकऱ्याला अश्रू अनावर झाले होते. जाणून–बुजून कोणीतरी खोडसाळपणा केल्याचा शेतकऱ्याचा आरोप आहे. मला पाणी मागितलं असतं तर आम्ही दिला असतं. मात्र कोणीतरी जाणून–बुजून हे केलं आहे. आमचे जनावर त्याचबरोबर आंब्याची झाडं आम्ही जगवायची कशी? असा प्रश्न रंभा काशीद यांनी उपस्थित केला. संबंधित पाणी चोरणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### शेतरस्ता उभ्या पिकातून नेल्याने...

या विनंतीला मान देता संबधितानी मध्यंतरातून रस्ता नेल्याने सुधाकर देशपांडे यांनी रविवार (ता.२७) मध्यरात्रीनंतर बंगाली पिंपळ्याच्या गावखोर मधील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन जीवन यात्रा संपविली. आज सकाळी चकलांबा पोलिस घटस्थळावर दाखल झाले. मृत सुधाकर देशपांडे यांच्या मृतदेहाचा पंचानामा करुन मृतदेह चकलांबा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यास पाठविण्यात आला असून, पोलिस तपासत आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे समोर आले तर त्यानुसारच गुन्हा दाखल करण्यात येईल असे एपीआय संदीप पाटील यांनी सांगीतले.

# लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणाऱ्या वटवृक्षाला भिषण आग

## २ तासानंतर अग्निशामक दलाला आग विझविण्यात यश



लिंबागणेश । प्रतिनिधी

**बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या अडीचशे वर्षांपूर्वीचा ४-५ पिढ्यांचा लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणाऱ्या वटवृक्षाला आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी आग लागली. डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी बीड नगरपरीषदेच्या अग्निशामक दलाशी संपर्क साधुन दुर्दैवी घटनेची कल्पना दिली.**

अर्ध्यातासात बीड नगर परीषदेचे अग्निशामक दलाचे रमेश आदमाने, अक्षय नखाते आणि वाहन चालक अनिकेत कपाळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. २ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग विझविण्यात यश आले. दरम्यान पाणी संपल्याने लिंबागणेश येथील गावाला टँकर द्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या दादाराव येडे यांनी विनामूल्य आग विझवण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांना कळल्यानंतर वनविभागाचे दोन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील जवळपास अडीचशे वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला आज सकाळी ९ च्या सुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांनी याठिकाणी गर्दी केली होती. आगीने रौद्ररूप धारण केल्याने आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण केले. आगीत वटवृक्षाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व विक्रांत वाणी यांनी बीड अग्निशामक दलाला तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी काकडे यांना फोटो आणि व्हिडिओ पाठवुन वडाला लागलेल्या आगीची कल्पना दिली. या झाडांवर वास्तव्यास असलेल्या पक्षांची घरटी आगीत जळून खाक झाली.

**मानवी निष्काळजीपणामुळे आगीच्या घटनेत वाढ**

उन्हाची तिव्रता वरचेवर वाढत चालली आहे. ग्रामीण भागात ग्रामस्थांनी कचरा व शेतकऱ्यांनी खोडवा पेटवण्याच्या घटनांमुळे वृक्ष आगीत होरपळून जात आहेत. ग्रामस्थांनी वारंवार आवाहन करूनही वृक्षांचे गांभीर्य लक्षात येत नसल्याचे आजच्या घटनेवरून दिसून येत आहे. पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी प्रत्येक माणसाने वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन आणि आगीपासून संरक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे वृक्षप्रेमी डॉ.गणेश ढवळे यांनी आवाहन केले आहे.

# दिव्यांगाच्या कागदपत्राची घरीच होणार पडताळणी : प्रशांत जाधवर



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील दिव्यांग निराधार व विविध योजनेतील लाभार्थ्यांना अपंगत्वामुळे हालचाल करता येत नसेल किंवा तहसील कार्यालयात येता येत नसेल तर अशा लाभार्थ्यांच्या कागदपत्राची (डीबीटी) आता घरीच पडताळणी होणार असून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी केले आहे. संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना, दिव्यांग लाभार्थी अतिवृद्ध व्यक्ती, असतील ज्यांना हालचाल करणे अशक्य आहे व जे तहसील कार्यालय किंवा डीबीटी कॅम्प साठी येऊ शकत नाहीत. त्यांचे आधार कार्ड, राशन कार्ड, बँक पासबुक आणि मोबाईल नंबर हा ८१४९४६८८८४ या मो. नंबर वर व्हाट्सअप ला कळवा अथवा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी व मंडळ अधिकारी यांचे मार्फत तहसीलदार कळवावे, त्यांची (डीबीटी) कागदपत्राची पडताळणी घरबसल्या करून घेतली जाईल. त्यामुळे मित्र, नातलग, परिचित, शेजारी व तालुक्यातील सर्व नागरिकांना हा मेसेज कळवावा असे आवाहन नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी केले आहे.

# डॉ.अव्दैत देशपांडे याचे राष्ट्रीय स्तरावरील एमसीएच परीक्षेत यश



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील डॉ.अव्दैत सतिश देशपांडे यांनी नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील नीट अति विशेषोपचार एमसीए च पात्रता परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले असून या परिक्षेत त्याने ६०० पैकी ४६० गुण मिळवून संपूर्ण भारत देशातून १९० वा क्रमांक पटकावला आहे. पुढे मुत्राशय विषयात उच्च शिक्षण व प्राविण्य मिळवण्याचा त्यांचा मानस आहे.

प्रामाणिक प्रयत्न, चिकाटी, जिद्द, परीश्रम तसेच श्रीदत्त, सर्वज्ञ दासोपंत कृपा, आई डॉ. अर्चना देशपांडे, वडिल डॉ.सतिश देशपांडे, बहिण डॉ. अपूर्वा देशमुख, काका, निवृत्त अभियंता विष्णु कुमार देशपांडे, निवृत्त प्रा.रत्नाकर देशपांडे, काकु, मामा, अनिल कुलकर्णी, इतर नातेवाईक याचे मार्गदर्शन व प्रोत्साहन यामुळे हे यश प्राप्त झाल्याचे डॉ.अव्दैत देशपांडे यांनी सांगितले. डॉ.अव्दैत यांनी मिळविलेल्या घवघवीत यशबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व स्वागत होत आहे.

# दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन

## नाव नोंदणी करण्याचे आवाहन : भिक्खु धम्मशिल थेरो

बीड । प्रतिनिधी



तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, सध्या मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. हा सुट्ट्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पंधरा वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा. असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

**यांना नोंदणीसाठी संपर्क**

श्रामणेर शिबिराचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या संयोजनात शिबिर होत असून नाव नोंदणीसाठी भास्कर सरपते ७३८७१४९२२३,अलका डोंगरे ९०२१७८६३३१, उद्धव खरात ९९२१७८०५५५, राणू डोळस ९७३०२६१२२१, वंदना वाघमारे ९२८४९७६८१९, प्रदिप घाडगे ७०२०५९१९८१, सुरेश डोळस ९७६४४८७०६८, पंडित चव्हाण ७५८८९३२७९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाजप पक्षाशी एकनिष्ठतेचे फळ सुखदेव रेडे यांना मिळाले : मा.आ. केशवदादा आंधळे यांनी केला सत्कार



वडवणी । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून कुठल्याही प्रकारची अशा न बाळगता भारतीय जनता पक्षाशी आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या घराण्याची एकनिष्ठ राहून तसेच राजकारणाची सुरुवातही भाजप या पक्षात झाली. भाजपचे अहोरात्र काम करत राहिल्याने व सुखदेव रेडे यांना त्यांच्या कामाची पावती म्हणून त्यांना भारतीय जनता पक्षाचे वडवणी तालुकाअध्यक्ष पद मिळाले असे मत चौसाळा विधानसभा मतदार संघाचे माजी.आमदार केशव दादा आंधळे यांनी व्यक्त केले.


माजी आमदार केशव दादा आंधळे यांच्या निवासस्थानी भाजपाचे निवड नवनिर्वाचित वडवणी तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे यांचा तालुक्यातील भाजपच्या वतीने ठेवण्यात आलेल्या भव्य सत्कार समारंभ प्रसंगी वडवणी नगर पंचायतीचे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी तालुकाध्यक्ष विश्वनाथ झाटे, संजय आंधळे, अंकुश वारे, अनिल घोले, शिवाजी देवकते. महादेव सावंत, रंणजीत धस, धनराज मुंडे, भागवत शिंदे, अभिमान कदम, विठ्ठल शिंदे, नारायण सोळंके, दत्ता रेडे, सुशील कदम, धनंजय आंधळे यासह डोंगरपट्यातील व तालुक्यातील भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानदीप विद्यालयातील आठ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

धारूर । प्रतिनिधी




धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय किल्ले धारूर चे तब्बल आठ विद्यार्थी इयत्ता पाचवी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. धारूर शहरातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील अंतरा आनंद फपाळ, प्रशंसा सुरेंद्र कल्याणकर, समीक्षा रमेश चाटे, अक्षया महादेव कणसे, साईनाथ अमोल गुळवे, राजश्री बालासाहेब कठाळे, केतकी संदीप बनसोडे, आश्लेषा गणेश आगे या आठ विद्यार्थ्यांनी घवघवीत असे यश संपादित केलेले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद व पालक वर्गातून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे.



# आर बी आय आणि गजानन बँकेच्या वतीने सायबर सुरक्षा कार्यशाळा

बीड । प्रतिनिधी

भारतीय रिझर्व बँक व श्री गजानन नागरी सहकारी बँक लिमिटेड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा कार्यशाळा दि.२८/४/२०२५ रोजी सोमवारी सकाळी वेळ १०.३० वाजता बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर कार्यशाळेला बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आर. क्षीरसागर, बँकेचे सर व्यवस्थापक, एम.एस. शेख, कुंबेफळकर सहाय्यक व्यवस्थापक, वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी व सर्व कर्मचारी, संचालक मंडळ, स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य, इतर बँकेचे सीओ, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासक राजा मचाले एसकेएच मेडिकल कॉलेजचे प्राचार्य भस्मे सर, ग्राहक, सर्व सभासद, खातेदार उपस्थित होते.

सदर कार्यशाळा रिझर्व बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक मनोज व मॅडम यांनी सायबर सेक्युरिटी का आवश्यक आहे व त्यावर उपाययोजना काय करावी याबद्दल सविस्तर माहिती उदाहरणासह सांगितले आहे तसेच सायबर क्राईम पासून बँकांनी सावध कसे राहायला पाहिजे त्याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. सदर कार्यशाळा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली आभार प्रदर्शन बँकेचे संचालक तागडे यांनी केले आहे.



### भारतरत्न डॉ.आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भगवान बाबा प्रतिष्ठान येथे सन्हभोजन कार्यक्रम संपन्न

# बॅनरसह इतर व्यर्थ होणारा खर्च न करता अन्नदान करावे : वीर

बीड । प्रतिनिधी

श्री.संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे १४ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक कार्यक्रम व उपक्रम राबवून मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील प्रति वर्ष प्रमाणे याही वर्षी शहरातील नेते मंडळी, पत्रकार, व्यापारी तसेच मित्रपरिवार यानी उपस्थित राहुन प्रथम डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सामूहिक वंदना घेत अभिवादन केले. भगवान बाबा येथील नागरिकांनी बॅनर सह,डिजे सह ईतर व्यर्थ खर्च टाळत स्नेहभोजनचा कार्यक्रम करण्याचा निर्णय घेत, सामाजिक एकोपे चे दर्शन घडवले. या कार्यक्रमात लहानथोर मंडळी सह महिलांनची उपस्थित लक्षणीय होती.

डॉ. आंबेडकर यानंच्या जयंती निमित्त स्नेहभोजन कार्यक्रमाचे हे चौथे वर्ष असून, यापुढे ही प्रत्येक वर्षी स्नेहभोजन सह सामाजिक उपक्रम राबवून अभिवाद करण्यात येणार आल्याची माहिती वीर यांनी दिली. यावेळी प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, दैनिक पार्श्वभूमीचे संपादक गंमत भंडारी, रिपाई जिल्हाध्यक्ष मायाताई मीसळे, ॲड.राजेश शिंदे, झङख पान पाटील साहेब, ॲड.राजेंद्र कोरडे, प्रा.अरूण मुंडे सर होते. या कार्यक्रमाचे आयोजक प्रा.टाकणखार, महेंद्र वाघमारे साहेब, प्रा.राजू कोरडे, सुलाखे सर, विलास भाऊ कोरडे, केचळे सर, वायबसे साहेब, ॲड.लघाणे, निलेश गलधर, राजू डोळस, सौरभ बन्सोडे, सौरभ मुंडे, पिंटू मिसळे, अशोक गायकवाड साहेब, सुंदर भिसे, सचिन कांबळे, सुधीर हजारे, सुदर्शन काळे, समर्थ दळवी, आनंद वीर सह नागरिकानी व महिलांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला.

# कांदेवाडी येथे कै.शिवाजीराव खाडे यांच्या तृतीय पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन

## भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : प्रदीप खाडे

धारूर । प्रतिनिधी



कांदेवाडी ता.धारूर येथील कै.शिवाजीराव रामभाऊ (अण्णा) खाडे यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमित्त दि.३० एप्रिल रोजी ह.भ.प.सोपान महाराज कनेरकर व दि.१ मे रोजी ह.भ.प. प्रशांत महाराज मोरे यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे. या सुश्राव्य कीर्तन कार्यक्रमास ग्रामस्थ व परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन खाडे कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले आहे.

परळी विधानसभा मतदारसंघाचे आ. धनंजय मुंडे यांचे विश्वासू प्रदीप खाडे, विलास खाडे, बालासाहेब खाडे यांचे वडील जेष्ठ नागरिक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तीमत्व कै.शिवाजीराव रामभाऊ (अण्णा) खाडे यांच्या पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. । मनि होता भोळेपणा कधी न दाखवला मोठेपणा । अजूनही होता भास तुम्ही आहात जवळ पास । काळाने जरी हिरवले अनंत तुमची छाया । नित्य स्मरते आम्हा अनंत तुमचीच माया ।। वैशाख शु.३ शके १९४७ गुरुवार दि.३० एप्रिल २०२५ रोजी लाखों युवकांचे प्रेरणास्थान, प्रखर विचारवंत, ख्यातनाम वक्ते, युवा कीर्तनकार ह.भ.प.सोपान महाराज कनेरकर यांचे रात्री ९ ते ११ हरिकिर्तन होणार आहे. शुक्रवार दि.१ मे रोजी सकाळी ११ ते १ जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज ह.भ.प.प्रशांत महाराज मोरे यांचे सुश्राव्य हरिकिर्तन होणार आहे. श्री हनुमान मंदिराच्या भव्य प्रांगणात किर्तनाचा कार्यक्रम होणार असुन यासाठी भव्य दिव्य वॉटर प्रुफ मंडपाची उभारणी करण्यात आली आहे. कै.शिवाजीराव खाडे हे आदर्श व्यक्तीमत्व होते आणि त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून प्रदीप खाडे, विलास खाडे, बालासाहेब खाडे हे धार्मिक परंपरा जोपासत आहेत. आई - वडीलांच्या सेवेसारखे पुण्य कशातच नाही या गोष्टीकडे लक्ष केंद्रीत करत ते आपले कार्य करित आहेत. आपल्या वडिलांची मनोभावे त्यांनी सेवा केली. आपल्या वडीलांच्या स्मृती कशा जपाव्यात याचे उत्तम उदाहरण हे तिघे भावंड आहेत. त्यांच्यामुळे आज अध्यात्मिक वातावरण वाढत आहे.

कांदेवाडी येथील बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे भुतपुर्व शाखाधिकारी शिवाजीराव खाडे हे बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या परळी, आंबेजोगाई, बीड, घाटनांदुर व धर्मापुरी शाखेच्या व्यवस्थापकपदी त्यांनी काम केले होते.सर्वपरिचित असे ते व्यक्तिमत्व होते. रामायणाचे ते गाढे अभ्यासक होते. कांदेवाडी येथील पहिले पदवीधर म्हणून त्यांची विशेष ओळख होती. धारूरसह परळी वैजनाथ व परिसरात जुने ज्येष्ठ व्यक्तीमत्व म्हणुन प्रसिध्द होते. या बरोबरच शेतीनिष्ठ शेतकरी म्हणुन ते परिचित होते. तसेच धार्मिक क्षेत्रा बरोबरच सामाजिक क्षेत्रासह अन्य कार्यात अग्रेसर म्हणून धारूर तालुक्यासह बीड जिल्ह्यात सुपरिचित असणारे व्यक्तीमत्व म्हणून कै.शिवाजीराव खाडे यांचे ओळख होती.

कांदेवाडी येथील ग्रामस्थ, नातेवाईक,सर्व गुणीजण महाराज, गायक, वादक, भजनी मंडळी तसेच परिसरातील भाविक भक्तांनी सुश्राव्य किर्तन ऐकण्यासाठी व भोजनासाठी कांदेवाडी ता.धारूर (दिंद्रड येथून दक्षिणेस ५ किमी अंतरावर) येथे उपस्थित रहावे असे आवाहन श्री. प्रदिप शिवाजीराव खाडे (अध्यक्ष, कै.रामभाऊ आण्णा खाडे सेवाभावी संस्था, लातूर, अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ कुमठा, तथा सहसचिव नाथ शिक्षण संस्था परळी वैजनाथ), विलास शिवाजीराव खाडे, बालासाहेब शिवाजीराव खाडे व खाडे परिवार यांनी केले आहे.

# पहलगाम हल्ल्यातील पीडित कुटुंबीयांना ५० लाखांची आर्थिक मदत

## रोजगार आणि शिक्षणाची जबाबदारी देखील उचलणार; मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठा निर्णय

बीड । प्रतिनिधी



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पहलगाम हल्ल्यातील पीडित कुटुंबीयांना ५० लाखांची आर्थिक मदत राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या सुरुवातीला पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत झालेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार पीडित कुटुंबातील व्यक्तींची रोजगार आणि शिक्षणाची जबाबदारी देखील राज्य सरकारच्या वतीने उचलण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. पीडित जगदाळे कुटुंबातील मुलीला नोकरी देण्याचा निर्णय देखील राज्य सरकारच्या वतीने घेण्यात आला आहे. या बरोबरच पहिलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील मृत झालेल्या पर्यटकांना मोठ्या प्रमाणात मदत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

यात पीडित कुटुंबांना आता ५० लाखांची आर्थिक मदत राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणार आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते.

### परिवाराच्या पाठीशी राज्य सरकार ठामपणे उभे –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, सर्व प्रकारे दहशतवादाचा विरोध आणि दहशतवादामुळे ज्यांच्या मृत्यू झाला आहे, त्यांच्या परिवाराच्या पाठीशी राज्य सरकार ठामपणे उभे आहे, हे दाखवण्याचा प्रयत्न राज्य सरकारचा असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यानुसार पीडित कुटुंबाला ५० लाख रुपये, तसेच रोजगाराचा प्रश्न असेल तर नोकरीची संधी दिली जाणार आहे. तसेच शिक्षणाचा प्रश्न असेल तर शिक्षणाचा खर्च देखील राज्य सरकार करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडण फडणवीस यांनी सांगितले.

### अतिरेक्यांनी पर्यटकांना प्रथम त्यांचा धर्म विचारला

जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यात २६ पर्यटक ठार झाले आहेत. या हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ जण मृत्यूमुखी पडलेत. यात डोंबिवलीतील ३, पुण्यातील २ व पनवेल येथील एकाचा समावेश आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे जम्मू काश्मीरच्या पलगमामध्ये मंगळवारी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटक झाले. यात महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. लष्कराच्या वेशात आलेल्या या अतिरेक्यांनी पर्यटकांना प्रथम त्यांचा धर्म विचारला आणि त्यानंतर ओळखपत्र पाहून त्यांना गोळ्या घातल्या. मृतांत २ परदेशी नागरिकांचाही समावेश आहे.

### या सहा पर्यटकांचा झाला मृत्यू

या अतिरेकी हल्ल्यात पुण्यातील कौस्तुभ गणबोटे व संतोष जगदाळे या दोन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. पनवेल येथून एकूण ३९ पर्यटक जम्मू–काश्मीरच्या पर्यटनासाठी गेले होते. या हल्ल्यात पनवेल येथील खांदा कॉलनी येथे राहणारे दिलीप देसले यांचा मृत्यू झाला. तर या हल्ल्यात डोंबिवली (पूर्व–पश्चिम) येथील नवपाडा, पांडूरंग वाडी व नांदिवाली भागातील ३ जणांचा मृत्यू झाला आहे. हेमंत जोशी, संजय लेले व अतुल मोने अशी त्यांची नावे आहेत. हे सर्वजण पर्यटनासाठी जम्मू काश्मीरला गेले होते.



# पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात

## लवकरच वाहतुकीसाठी पुल खुला होणार : राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी



लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कल मधील पिंपळवाडी ते भाळवणी रस्त्यावर बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सामान्य जनतेला वाहतुकीसाठी हा पुल पुढील काही दिवसात खुला होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. पिंपळवाडी, भाळवणी डोंगरी पट्ट्याचा परिसर. या परिसरातील शेतकरी शेतीसह दूध, दही, भाजीपाला शेती पुरक व्यवसाय करतात. रोज बीड शहरात दुध दही विकण्यासाठी येतात. डोक्याचावाडा साठवण तलावाखाली बिंदुसरा नदीचे पात्र रुंद असल्यामुळे पावसाळ्यात शाळेतील मुले, दुग्ध व्यवसायीक शेतकरी, सर्वसामान्य माणूस यांना रहदारीला अडचण होते. पुरसदृश्य परिस्थितीत पिंपळवाडी व परिसरातील गाव खेड्यांचा पुला अभावी संपर्क तुटतो. यामुळे जनतेचे हाल होतात. पुला अभावी पावसाळ्यात होणारी अडचण लक्षात घेऊन, अनेक वर्षापासून या पुलाची मागणी ग्रामस्थ करत होते. लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र मस्के यांच्याकडे डोंगरपट्ट्यातील नागरिकांनी पुलाची मागणी केली होती. डोंगरपट्ट्यातील गाव खेड्यांना जोडणारा हा महत्वपूर्ण पुल मंजूर करण्यासाठी शासन प्रशासन स्तरावर राजेंद्र मस्के यांनी सातत्याने पाठपुरावा करून हा पुल मंजूर करून घेतला.

प्रलंबित विकास कामाला गती मिळाली. या पुलामुळे भविष्यात वाहतूकीसाठी अडचण निर्माण होणार नाही. या पुलाचे काम आज अंतिम टप्प्यात असून येणाऱ्या काही दिवसात आठ ते दहा गावांना सुलभतेने जोडणारा हा पूल जनतेसाठी खुला होणार आहे. आगामी काळात या भागातील विकास कामांना प्राधान्य देवून जनतेचे हित साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहाणार आहोत, असा विश्वास राजेंद्र मस्के यांनी दिला आहे.



# धारूर भाजपा च्या वतीने गाव, बस्ती अभियानाची सुरवात

धारूर । प्रतिनिधी

भा.ज.पा. पार्टी यांच्या वतीने संपूर्ण राज्य मध्ये सुरु करण्या आलेल्या गाव/बस्ती अभियानास जनतेचा प्रतिसाद मिळत आहे. किल्ले धारूर येथे दि.२८/४/२०२५ रोजी भा.ज.पा. च्या गाव /बस्ती चलो अभियान अंतर्गत भायजळी या वस्ती वर भेट घेउन नागरिकांचा आडी अडचनी जानुन घेतल्या व ज्येष्ठांचा सत्कार करण्यता आला. लाभार्थी यांच्या कुटुंबास भेट, वस्ती शाळेला भेट व विद्यार्थांशी चर्चा हा कार्यक्रम घेण्यात आला या वेळी भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, माजी तालुका अध्यक्ष ॲड.बालासाहेब चोले, तालुकाध्यक्ष संदीप काचगुंडे, भाजपा युवामोर्चा शहरध्यक्ष ॲड.मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी युवा नेते राधा कृष्ण चोले महाराज सर्व मान्यवर उपस्थित होते.

# प्राणीमात्रांचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्र्यांचं पशुधनांविषयीचं मातृत्व 'वात्सल्य' आलं समोर

## पंकजाताई मुंडेंनी स्विकारलं दोन गोड पिलांचे पालकत्व: 'प्रिती व रोझी' च्या गृहप्रवेशाचं हृदयस्पर्शी स्वागत

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची संवेदनाशीलता सर्व परिचित आहे. त्याचबरोबर त्यांचे श्वानप्रेमही सर्वांना ज्ञात आहे.एक व्यासंगी, परखड वक्ता, अभ्यासू खंबीर लोकनेता अशी प्रतिमा असलेल्या पंकजाताई मुंडे यांच्या अतिशय संवेदनाशील व मातृवत वात्सल्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची अनुभूती अनेकवेळा येते. असाच काहीसा प्रसंग काल बघायला मिळाला. या प्रसंगातून व्यक्ती म्हणून पंकजाताईंचा प्राणीमात्रांबद्दलचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई म्हणून पशुधनांविषयीचे त्यांचे मातृवत 'वात्सल्य' समोर आले आहे.

कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी स्वतःच्या घरी लेकरं सांभाळावे या पद्धतीने आठ श्वानांच्या पिलांचा सांभाळ केलेला होता. यापैकी दोन पिलं त्यांनी पंकजाताई मुंडे यांना देवू केली.श्वानप्रेमी असलेल्या पंकजाताई व त्यांचा सुपूत्र आर्यमान यांना अतिशय आनंद झाला.या नविन दोन श्वानांच्या आगनमनाचा उत्साह व उत्सुकता त्यांना लागलेली होती. अतिशय भावनिकतेने व जिव्हाळ्याने कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी या पिलांचा सांभाळ केलेला होता. त्यांनाही या पिलांचा विरह सहन होणारा नव्हता. त्यामुळे सर्व प्रकारची काळजी घेत कोल्हापूरहून मुंबई पर्यंतचा प्रवास करत शिंदे कुटुंब ही पिले घेऊन आली.



पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी या पिलांना आणण्यात आले. यावेळी सोनाली शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांचे पंकजाताईंनी कृतज्ञतापूर्वक अतिशय प्रेमाने स्वागत केले. त्याचबरोबर त्यांनी आणलेल्या रोजी आणि प्रिती या दोन श्वान पिलांचे मातृवत स्वागत केले. आपल्या कुटुंबात नव्या सदस्यांचे स्वागत करावे असा अतिशय उत्साहात प्रिती आणि रोझीच्या गृहप्रवेशाचा एक छोटेखानी आनंदी सोहळा यावेळी साजरा करण्यात आला. पंकजाताई मुंडे यांनी हळद कुंकू लावून त्यांचं आत्मीय स्वागत केलं. मुक्या प्राण्यांनाही आत्मिय ओढ असते आणि विरहाची पण संवेदना असते. हे या एकाच अतिशय भावनिक प्रसंगात दिसून आले. कोल्हापूरच्या मोकळया वातावरणात जडणघडण झालेली व राहिलेली ही पिले मुंबईच्या वातावरणात कशी राहतील असा प्रश्न सर्वांनाच पडलेला असताना मात्र पंकजाताई मुंडे यांच्या जिव्हाळ्याने ही पिले त्यांना लगेचच बीलगल्याचे दिसून आले. शिंदे कुटुंबीय या पिलांना सोडून गेल्यानंतर या पिलांना सुरक्षित वाटावे यासाठी स्वतः पंकजाताई मुंडे व त्यांचा मुलगा आर्यमान यांनी या पिलांना बराच वेळ सहवासही दिला. याबाबतचा एक भावनिक असा व्हिडिओही पंकजाताई मुंडे यांनी सोशल माध्यमातून शेअर केला. नव्या सदस्यांचे अगदी संवेदनशीलपणाने मातृवत स्वागत आणि काळजी घेतानाच्या पंकजाताई मुंडे यात दिसून येत आहेत. हे सर्व पाहतांना शिंदे कुटुंबीय अगदीच भारावून गेल्याचे दिसुन येत आहे.

दरम्यान सोनाली शिंदे युट्यूबर असुन त्यांनीही एका व्हिडिओद्वारे पंकजाताई मुंडेंच्या या प्राणीप्रेमाचे व संवेदनाशीलतचे भरभरून कौतुक केले आहे. पोटच्या लेकरांप्रमाणे ज्या पिलांचा आपण सांभाळ केला आता त्यांना अतिशय छान घर आणि पंकजाताईंसारखे मातृवत प्रेम करणारे पालक मिळाल्याचा अतिशय आनंद झाल्याचे म्हटले आहे.

# आष्टीत सुरेश पाटील यांच्या हस्ते बांधकामाचे भूमिपूजन

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील वटनवाडी येथील गरीब कष्टकरी, अल्पभूधारक शेतकरी भीमराव पोकळे यांच्या नवीन घराच्या वास्तूचे भूमिपूजन शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा समाजसेवक सुरेश पाटील यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.



प्रत्येक व्यक्तीला आपले स्वतःचे सुंदर घर असावे असे वाटते. परंतु आर्थिक अडचणीचा सामना करत नैसर्गिक आपत्ती सह कृत्रिम आपत्तीला तोंड देत आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवस रात्र कष्ट करुन पै–पै जमा करुन स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु गेल्या काही दिवसांत लोखंड, सिमेंट, विटांचे दर वाढले आहेत. त्यामुळे गोरगरिबांना घर बांधणे आवाक्याबाहेर जात आहे. मजुरी साठीही पूर्वीपेक्षा आता अधिक पैसे मोजावे लागत आहेत. अशा परिस्थितीत आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथील गरीब कष्टकरी अल्पभूधारक शेतकरी भीमराव पोकळे यांचे अनेक दिवसापासूनचे घराचे स्वप्न आज प्रत्यक्षात साकार होत आहे. नवीन घराच्या बांधकामाचे भूमिपूजन सामाजिक कार्यकर्ते तथा ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सिव्हिल इंजिनियर चंद्रकांत धस, घराचे मालक भिमराव पोकळे, बांधकाम करणारे कामगारासह गावातील प्रतिष्ठित नागरीक उपस्थित होते.

# प्रशासन आपल्या दारी आले आहे निराधार लाभार्थ्यांनो गावातच डीबीटी करून घ्या : नायब तहसीलदार प्रशांत जाधवर

बीड । प्रतिनिधी

सध्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाभरात संजय गांधी, श्रावणबाळ विभागामार्फत गावोगावी कॅम्पचे आयोजन करण्यात येत असून लाभार्थ्यांची डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून देण्याची मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके हे वेळोवेळी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वयोवृद्ध लाभार्थ्यांना तहसील कार्यालयास येण्याची गरज भासू नये यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे.

सोमवार २८ एप्रिल रोजी कुर्ला येथे अशाच एका कॅम्पचे आयोजन प्रशासनामार्फत करण्यात आले. नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांच्या उपस्थितीत वयोवृद्ध महिला व लाभार्थी यांचे डीबीटी प्रक्रिया पूर्ण करून घेण्यात आली. यावेळी माहिती देताना नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी नमूद केले की बीड तालुक्यात संजय गांधी योजनेचे म्हणजेच ज्यांचा वयोगट१८ ते ६५ वर्षे आहे, त्यांची लाभार्थी संख्या ८८६० इतकी आहे. या लाभार्थ्यांना राज्य शासनामार्फत प्रतिमाह १५०० रुपये इतके मानधन देण्यात येते. श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी हे ६५ वयापुढील असतात. अशा लाभार्थ्यांची संख्या ८८२४ इतकी आहे. ६५ वर्षावरील लोकांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन अनुदान योजना सुद्धा असून त्या योजनेचे ३७३१ लाभार्थी आहेत. या योजनेत राज्य शासन १००० रुपये तर केंद्र शासन ५०० रुपये इतके मानधन लाभार्थ्यांना देत असते. डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक आहे. त्यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्ड हे



मोबाईल क्रमांकास लिंक असणे अनिवार्य आहे.

डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो. आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो. तो ओटीपी सांगावा लागतो. तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते. एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते.

या कॅम्पच्या वेळी कुर्ला गावच्या सरपंच मंडाबाई पांडुरंग मार्कड, उपसरपंच महादेव साहेबराव पटेकर, ग्रामपंचायत सदस्य शितल संदीप पाटील, औरंगपूरचे सरपंच गोरख महादेव चांगण, कुर्ला मंडळाचे मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ, ग्राम महसूल अधिकारी संजय नेवडे, उमेश खिंडरे, दुष्यंत शेळके, सुनील प्रधान, ग्राम महसूल सेवक कृष्णा राठोड, महसूल सेवक जवरे, संगणक ऑपरेटर महेंद्र राऊत व गावकरी परीक्षित पाटील, ज्ञानेश्वर यादव, ग्रामपंचायत शिपाई बाबासाहेब कानडे, महादेव आरसुळ, नवनाथ गव्हाणे, परमेश्वर गुंड, शेख खाजाभाई, भगवानराव यादव, दिगंबर शेवाळे उपस्थित होते.

यावेळी बोलताना नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी सांगितले की फार्मर आयडी सुद्धा शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून घ्यावा. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे स्वतः तालुक्यात फार्मर आयडी काढून घ्यावा यासाठी भेटी देत आहेत. तरी शेतकऱ्यांना आवाहन राहील की त्यांनी ॲग्री स्टॅक प्रकल्पांतर्गत आपला फार्मर आयडी काढून घ्यावा. त्यासाठी संबंधित ग्राम महसूल अधिकारी म्हणजेच तलाठी ग्रामसेवक अथवा गावचे कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले.

बीड तालुका प्रशासनाचा वयोवृद्ध व अडाणी लाभार्थ्यांप्रती असलेला हा कनवाळूपणा निश्चितच अभिनंदन आहे. ग्रामीण भागातील लाभार्थी, नागरिक हे खरोखरच प्रशासनाचे आभारी आहेत, अशा स्वरूपाची चर्चा यावेळी ऐकण्यास मिळाली. खचितच अशाप्रकारे प्रशासन नागरिकांसाठी दोन पावले पुढे आले तर प्रशासनाकडे नागरिक आपोआपच आदराने बघतील यात शंका नसावी.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT